९ मर्द

# महाराष्ट्र शासन

क्रमांक :- संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२१/म-६,
महसुल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ४/५/२०१६.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी.

विषय : **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**
**महसुल विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा अधिसूचित करण्याबाबत.**

संदर्भ : माझे क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.८२/म-८ दि.७/७/२०१५ चे पत्र व त्या सोबतची सहपत्रे

उपरोक्त विषयाबाबतचे माझे संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५" राजपत्रात अधिसूचित केला असून त्यामधील कलम ३ (१) नुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपील प्राधिकारी आणि नियतकालमर्यादा अधिसूचित करणे आवश्यक आहे. सदर अधिनियमाच्या कलम २ (ठ) नुसार "सार्वजनिक प्राधिकरण" याचा अर्थ स्पष्ट करण्यात आलेला असून त्यानुषंगाने सार्वजनिक प्राधिकरण म्हणून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून जिल्हाधिकारी कार्यालय किंवा त्यांच्या अधिनस्त कार्यालयांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा अधिसूचित करणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी १४ सेवा अधिसूचित केल्या आहेत.

व्यवसाय सुलभीकरण (Ease of Doing Business) व Make in Maharashtra या उपक्रमांचा भाग म्हणून उद्योगांना सर्व मंजुऱ्या एकाच ठिकाणी देण्याकरीता एक खिडकी योजना राबविणे व "मैत्री कक्ष" सक्षम करणेबाबत उद्योग उर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय क्र.मेइम-२०१४/प्र.क्र.१०५/उद्योग-८, दि. ११/२/२०१६ निर्गमित केला आहे. या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या महसूल व वन विभागाशी संबंधित सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अन्वये अधिसूचित करणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये यासंदर्भात उक्त अधिनियमाच्या कलम ३ (१) अन्वये राजपत्रात प्रसिध्द करावयाच्या अधिसूचनेमध्ये एकसमानता असण्यासाठी अधिसूचनेचे प्रारूप सोबत जोडले आहे. प्रारूप अधिसूचनेमधील लोकसेवा पुरविण्याबाबतचे स्तर किंवा लोकसेवा पुरविण्यासाठीची निश्चित कालमर्यादा न बदलता पदनामात स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक त्या सुधारणा करण्यास आपणांस मुभा राहील.

कृपया वरीलप्रमाणे अधिसूचना अविलंब राजपत्रात प्रसिध्द करुन त्यास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

४/५/२०१६

( मनु कुमार श्रीवास्तव )
प्रधान सचिव, महसुल

सहपत्र : वरीलप्रमाणे.

# महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय,

-----------------------,

दिनांक :

## प्रारूप अधिसूचना

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.

क्र. : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५(सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी,जिल्हाधिकारी,------@-------जिल्हा, याद्वारे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त महसूल कार्यालयांमार्फत नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे:-

### परिशिष्ठ

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम | प्रथम अपिल अधिकाऱ्याचे पदनाम | द्वितीय अपिल अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | उद्योजकांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४४अ च्या तरतूदीनुसार परस्पर औद्योगिक वापर सुरु करणे शक्य व्हावे त्याकरिता आवश्यक अधिकृत माहिती तातडीने उपलब्ध करुन देणे. | ३० | सबंधित जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी तथा शा.नि. क्र. एनएपी-२०१५/प्र.क्र.२८/टी-१, दि.३१.३.२०१५ अन्वये गठीत जिल्हा स्तरावरील औद्योगिक अकृषिक वापर सहाय्यभूत समितीचे अध्यक्ष | अपर जिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी " मैत्री कक्ष" | विकास आयुक्त तथा अध्यक्ष " मैत्री कक्ष" |
| २. | औद्योगिक प्रयोजनार्थ जमिन खोदण्याची परवानगी (गौण खनिज उत्खनन). | ३० | (i). तहसिलदार - ५०० ब्रास पर्यंत<br>(ii).उपविभागीय अधिकारी - २००० ब्रास पर्यंत | अपर जिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी " मैत्री कक्ष" | विकास आयुक्त तथा अध्यक्ष " मैत्री कक्ष" |
| | | | (iii). जिल्हाधिकारी - २५००० ब्रास पर्यंत | विकास आयुक्त तथा अध्यक्ष " मैत्री कक्ष" | प्रधान सचिव (महसूल) |
| ३. | औद्योगिक प्रयोजनार्थ जमीन वापरण्याकामी बिगर अधिसूचित वृक्ष तोड परवानगी | ३० | उपविभागीय अधिकारी संबधित महसूल विभाग | अपर जिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी " मैत्री कक्ष" | विकास आयुक्त तथा अध्यक्ष " मैत्री कक्ष" |

( )

**जिल्हाधिकारी,**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

Office of Collector,

_______________,

Dated

## NOTIFICATION

**MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ACT, 2015.**
@ To be filled in before issue.

No.      :- In exercise of the powers conferred by sub-section *(1)* of Section 3 of the Maharashtra Right To Public Services Act, 2015 (Mah.Act.No.31 of 2015), I, the Collector of_____@_____ District, hereby notify the public services rendered by the office of the Collector through the subordinate Revenue offices, along with the stipulated time limits for providing such public services, the Designated officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the Schedule appended herewith, for the purposes of the said Act.

**SCHEDULE**

| Sr. No. | Public Service | Time limit for providing service (Days) | Designated Officer | First Appellate Officer | Second Appellate Officer |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | *To provide official/ authenticated information to the concerned entrepreneur so as to enable him to make use of land for industrial purpose on his own as per section 44 A of MLRC, 1966.* | 30 | Additional Collector of the Concerned district cum Chairman Industrial Non-agricultural Use Facilitation Committee, constituted as per G.R. No.NAP-2015/ C.R.28/T-1, dated 31.3.2015. | Additional Collector & Nodal Officer " Maitri Kaksh" | Development Commisioner & President "Maitri Kaksh" |
| 2. | *Permission for digging land (Minor Mineral Extraction) for industrial purpose.* | 30 | (i) Tahasildar -up to 500 brass<br>(ii) Sub-Divisional Officer - up to 2000 brass | Additional Collector & Nodal Officer " Maitri Kaksh" | Commisioner & President "Maitri Kaksh" |
| | | | (iii) Collector -upto 25000 brass | Development Commisioner & President "Maitri Kaksh" | Principal Secretary (Revenue) |
| 3. | *Permission to cut any non-scheduled tree for making use of land for industrial purpose.* | 30 | Sub Divisional Officer of concerned revenue Sub-Division | Additional Collector & Nodal Officer " Maitri Kaksh" | Development Commisioner & President "Maitri Kaksh" |

(                )

Collector,